
पुण्यनगरी ५.५१.१.

# पोलीस भरतीतील गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी कॅमेऱ्यांचा वॉच

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालयातील शिपाई व चालक पदांसाठी सोमवारपासून थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच पोलीस भरती होत आहे. ९९६ पोलीस पदांसाठी ही भरती केली जाणार आहे. या पदांसाठी सुमारे ७४ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले असून पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. ही प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरू राहणार आहे. संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक



पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान या ठिकाणी सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होणार असल्याने येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात येणार असून या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात होणार आहे. सकाळी ५.३० वाजता उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यात प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक हजेरी घेतली जाणार आहे. त्यानंतर प्रत्येक उमेदवाराला चेस्ट क्रमांक दिला जाईल. सर्वप्रथम उमेदवाराची उंची व छाती मोजली जाणार आहे व या मोजणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारालाच पुढील चाचणीसाठी पाठवण्यात येणार आहे. पुरुष उमेदवाराला १६०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक तसेच महिला उमेदवारांना ८०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्यांचा समावेश आहे. हैदराबादच्या 'ई सॉफ्ट' या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात केवळ पुरुष उमेदवारांची निवड चाचणी होणार असून त्यानंतर महिला उमेदवारांची निवड केली जाणार आहे. भरती प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद, अचूक व पारदर्शक होणार असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे वेळ आणि श्रम कमी होणार आहेत. भरतीसाठी कोणीही पैशांची मागणी करत असेल तर उमेदवारांनी तातडीने त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे प्रकाश गायकवाड, पोलीस उपायुक्तांनी सांगितले.

**भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलीस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.**

पुण्यनगरी ५-पा-४.

# केसरी कुस्ती विजेत्यांना पालिका, पोलिसांकडून बक्षीस

**। मीरा रोड** : मीरा-भाईंदरमध्ये नागोबा फाऊंडेशनचे अध्यक्ष व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शंकर विरकर, सचिव तनुजा विरकर, ट्रस्टी आकांक्षा विरकर यांनी लालमातीच्या मर्दानी खेळाची परंपरा जपत मीरा-भाईंदर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात राज्यातील व राज्याबाहेरील नामवंत कुस्तीगिरांनी सहभाग घेत मैदान दणाणून सोडले. कुस्तीचे सामने पाहून महापालिका व पोलीस अधिकाऱ्यांनी पैलवानांना बक्षीस जाहीर केले.

पुरुष गटात पैलवान ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जमदाडे महान भारत केसरी विरुद्ध पैलवान भोला पंजाबी नॅशनल चॅम्पियन दिल्ली यांच्यात सामना झाला. यामध्ये ज्ञानेश्वर पैलवान हे विजयी झाले. तर महिला कुस्ती गटात ऐश्वर्या सणस, महाराष्ट्र चॅम्पियन, जय मल्हार कुस्ती संकुल, भाईंदर विरुद्ध वैदिका पाटील, सोनाळे तालीम यांच्यात ऐश्वर्या सणस ही विजयी झाली. तर दोन नंबरची कुस्ती ही पै. बाळू बोडके, ऑल इंडिया चॅम्पियन, आंतरराष्ट्रीय क्रीडा



संकुल, पुणे व बालाजी मेटकरी, महाराष्ट्र चॅम्पियन या दोघांत कुस्ती झाली. मीरा-भाईंदर केसरी, नागोबा फाऊंडेशन आयोजित प्रमुख उपस्थिती महापालिका आयुक्त दिलीप ढोले, संजय हेरवाडे (अतिरिक्त आयुक्त ठाणे महापालिका), संजय हजारे (काशिमीरा वरिष्ठ पोलीस निरीक्षक), पोलीस निरीक्षक प्रकाश मासाळ, विजय पवार, पोलीस उपनिरीक्षक भगवान पाटील व अन्य प्रशासनातले अधिकारी उपस्थित होते. या कुस्तीच्या सामन्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून काकासाहेब पवार, अर्जुनवीर पुरस्कार विजेते, सचिव महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, गणेश माणगुडे, संस्थापक कुस्ती मलविद्या महासंघ, संग्राम कांबळे, पोलीस उपअधीक्षक तथा प्रवक्ते कुस्ती मलविद्या, बाबा महाडिक, कोल्हापूर जिल्हा कुस्ती अध्यक्ष व वस्ताद, बापू रासकर व नामदेव बडरे, प्रवक्ते कुस्ती मलविद्या, युवराज वाघ, मुंबई महावीर केसरी व निवेदक शंकर अण्णा पुजारी व युवराज केचे, दीपक कुरकुंडे, अध्यक्ष धनगर प्रतिष्ठान व माधवी वारगीर महिला अध्यक्ष धनगर प्रतिष्ठान हे उपस्थित होते, तर त्याच वेळी आकांक्षा विरकर यांची कुस्ती मलविद्या महासंघ पदाच्या महाराष्ट्र महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्याच वेळी गरजू विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजात जाण्या-येण्यासाठी मोफत सायकल वाटप करण्यात आले. यावेळी आयुक्त दिलीप ढोले यांनी कुस्तीचे सामने पाहून मीरा-भाईंदर शहरात पैलवानांना मैदान उपलब्ध करून दिले जाईल व पैलवानांना सराव व राहण्याची व्यवस्था तिथेच असणार आणि त्यामुळे शहराचे नाव लौकिक होईल, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्यनगरी ५-पा-१.

# पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव होणार

**। मीरा रोड** । मीरा-भाईंदर शहरातील वाहतूक पोलिसांनी जप्त केलेल्या बेवारस वाहनांपैकी २१७ वाहनांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेली ही वाहने येत्या ६ महिन्यांत संबंधितांनी घेऊन जावीत; अन्यथा या वाहनांचा लिलाव करण्यात येईल, अशी जाहिरात प्रसिद्ध केल्याचे पोलीस विभागाकडून सांगण्यात आले आहे.

मीरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेवारस स्थितीत पडलेली वाहने, अनेक दिवस रस्त्याच्या कडेला लावून ठेवलेली वाहने, पादचाऱ्यांना चालण्यास व वाहतुकीस अडथळा करत असलेली वाहने तसेच महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना साफसफाई करताना अडथळा ठरत असलेली वाहने काशिमीरा वाहतूक विभागाकडून जप्त करण्यात येतात. ही वाहने मोटर वाहन कायद्यातील अधिकारांतर्गत ताब्यात घेत महापालिका प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या मीरा रोडच्या कनाकिया भागातील लक्ष्मीपार्क येथील गोडाऊनमध्ये ठेवण्यात आली आहेत. त्याठिकाणी मोठ्या संख्येने विविध प्रकारची वाहने जमा झाली असून पोलिसांना जागा अपुरी पडू लागल्यामुळे या जप्त वाहनांचा लिलाव करण्याचे ठरवण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या बेवारस वाहनांमध्ये ११४ दुचाकी, ९० रिक्षा व १३ चारचाकी वाहनांचा समावेश आहे. ही वाहने ज्यांची असतील त्यांनी वाहनांच्या मूळ कागदपत्रांसह काशिमीरा वाहतूक शाखेशी संपर्क करावा अथवा pitrkashimira.mb-vv@mahapolice.gov.in या ई-मेलवर अथवा ७७१००१२८९७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून वाहनाची ओळख पटवावी व मालकी हक्क सिद्ध करून ती ताब्यात घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

ही वाहने जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत ताब्यात घेतली नाहीत, तर या वाहनांची त्यांना आवश्यकता नाही, असे गृहित धरून या वाहनांचा महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार हक्क न सांगितलेली मालमत्ता समजून जाहीर लिलाव करण्यात येईल व येणारी रक्कम नियमानुसार शासनाकडे जमा करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

पुढारी पा-क्र.२.



मुंबई : महापालिकेच्या नायर रुग्णालयाच्या निवासी डॉक्टर्सनी बेमुदत संपात सहभागी होऊन आपला निषेध नोंदवला. छाया : दीपक साळवी

# निवासी डॉक्टर्स संपावर

## मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांतील दोन हजार डॉक्टर्स सहभागी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील एकूण २२ सरकारी रुग्णालयांतील जवळपास ७ हजार निवासी डॉक्टर्सनी विविध मागण्यांसाठी सोमवारपासून बेमुदत बंद पुकारला आहे. या संपाला पाठिंबा देत मुंबई महापालिकेच्या केईएम, सायन, नायर रुग्णालयातील सुमारे दोन हजार डॉक्टर संपात उतरले आहेत.

लेखी आश्वासन दिल्याशिवाय आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा मार्डकडून घेण्यात आला आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास अत्यावश्यक सेवेतूनही निवासी डॉक्टर्स लवकरच बाहेर पडतील, असा इशारा सेंट्रल मार्डकडून दिला गेला.

**● निवासी डॉक्टरांनी सायन रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर उभे राहून राज्य शासन, प्रशासनाच्या कार्यशैलीवर टीकेची झोड उठवत आपल्या मागण्या जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत संप सुरू राहणार असल्याचे ठणकावून सांगितले. यावेळी ओपीडीबाहेर जमलेली प्रचंड गर्दी पाहून रुग्णालय प्रशासनाने तत्काळ सायन पोलिसांचा बंदोबस्त मागवून जमलेल्या नागरिकांना रुग्णालयाबाहेर काढले.**

### निवासी डॉक्टरांच्या मागण्या

**● २०१८ पासूनचे थकीत वेतन मिळावे; वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या एक हजार ४३२ नवीन पदनिर्मिती करण्यात यावी.**

**● शासकीय महाविद्यालयात वसतिगृह आणि स्वच्छतागृहांची दुरवस्था दूर करावी; आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात.**

**● सर्व निवासी डॉक्टरांना समान वेतन लागू करण्यात यावे; कोविड भत्ता, महागाई भत्ता मिळावा, सहयोगी प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यात यावीत.**

संपामुळे अतिदक्षता विभाग वगळता बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) आणि नियमित आंतररुग्णसेवा बंद ठेवल्याने रुग्णसेवेवर परिणाम झाला. सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि सरकारी रुग्णालयांत निवास डॉक्टरांची संख्या मोठी आहे. त्यामुळे संप सुरू राहिल्यास रुग्णसेवा कोलमडण्याची शक्यता व्यक्त केली जाते आहे.

मार्ड या निवासी डॉक्टरांच्या संघटनेने विविध मागण्यांसाठी चार दिवसांपूर्वीच बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता. मात्र त्यावर प्रशासनाने कोणताही निर्णय न घेतल्याने सोमवारपासून राज्यभरातील सुमारे सात हजार डॉक्टरांनी बेमुदत संप पुकारला आहे. अत्यावश्यक वगळता इतर आरोग्य सेवा न देण्याचा निर्णय निवासी डॉक्टरांनी घेतला आहे.

अतिदक्षता विभाग वगळता इतर रुग्णसेवा बंद करत मार्डच्या संपाला सुरुवात झाली. केईएम, जेजे, नायर, कूपर, सायन अशा मोठ्या रुग्णालयांच्या बाहेर निवासी डॉक्टरांनी आपले आंदोलन करून संपात सहभाग नोंदवला.

संपाच्या पार्श्वभूमीवर रुग्णालय प्रशासनाकडूनही विशेष नियोजन करण्यात आले आहे. निवासी डॉक्टर संपावर जाणार असल्याने वरिष्ठ डॉक्टर आणि प्राध्यापकांकडे विविध जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. सायन, केईएम, जेजे रुग्णालयात ओपीडीवर परिणाम होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. दरम्यान, अपघात विभाग, प्रसूती कक्ष, आय.सी.यू. या विभागांमध्ये रुग्णसेवा सुरू ठेवली जाईल, असे मार्डच्या प्रतिनिधीने सांगितले.


**काही नियोजित शस्त्रक्रिया रद्द**

रुग्णालयाबाहेर लांब रांगा पाहायला मिळाल्या. निवासी डॉक्टर्स नसल्याने ५० टक्के शस्त्रक्रिया रद्द करण्यात आल्या.

सामना ०३.०१.१८

## जिम ट्रेनरचा श्वास कोंडल्याने मृत्यू

वसई, दि. २ (सा.वा.) - नववर्षाच्या पहिल्याच दिवशी नालासोपारा येथे एक दुर्दैवी घटना घडली. तरुणांना फिटनेसचे धडे देणाऱ्या जिम ट्रेनरचा श्वास कोंडून मृत्यू झाला. देविदास जाधव (३५) असे या तरुणाचे नाव आहे.



देविदास नालासोपारा पश्चिमेतील शालीभद्र यश अपार्टमेंटमध्ये राहात होता. तो डिसिल्व्हानगर येथील 'द फिटनेस कार्डेस' या जिममध्ये तरुणांना व्यायामाचे धडे द्यायचा. १ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसात वाजता घरी असताना त्याला अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. काही वेळातच तो बेशुद्ध पडला. यानंतर कुटुंबीयांनी त्याला रिद्धी विनायक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. मात्र दवाखान्यात दाखल होण्याआधीच तो मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत नालासोपारा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. एका जिम ट्रेनरचा अकाली मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# भाईंदरमध्ये दुकानांवर मराठी पाट्या लागणार

### आयुक्तांनी खडसावल्यावर दुकानदार जागे




भाईंदर, दि. २ (सा.वा.) - मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यामुळे शहरातील सर्वच दुकानदारांनी आपल्या दुकानांवर मराठी नामफलक लावावेत, असे निर्देश मीरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त दिलीप ढोले यांनी दिले आहेत. जर दुकानांवर आणि आस्थापनांवर मराठी पाट्या दिसल्या नाहीत तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियमानुसार मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. तरीसुद्धा शहरातील नामफलक इतर भाषांतून आहेत. मराठीला डावलले जात असल्याची तक्रारही मराठी एकीकरण समितीने महापालिकेकडे केली होती. सन २०१७ पासून त्याचा सातत्याने पाठपुरावासुद्धा केला होता. पालिकेच्या महासभेत तसा ठरावही मंजूर करण्यात आला होता, परंतु पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी जिल्हाधिकारी आणि सचिवालय कोकण विभाग यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. त्यानंतर आयुक्तांनी शहरातील सर्वच दुकाने आणि आस्थापनांवर मराठी नामफलक लावण्याच्या सूचना सर्वांना दिल्या आहेत. त्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक काढून शहरात व्यवसाय करत असलेल्या सर्व आस्थापनांना कळवण्यात आले आहे. जर मराठी नामफलक दुकानांवर लागले नाही तर संबंधित दुकानदार किंवा आस्थापना मालक यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे, अशी प्रतिक्रिया महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी व्यक्त केली आहे.

पुढारी ०३.०१.१८

## वसईत १७० तळीरामांना ठोठावला दंड

**विरार :** थर्टी फर्स्ट खूपच उत्साहात साजरा करणे १७० जणांवर तळीरामांना महागात पडले. सार्वजनिक ठिकाणी अशा वेळी पाळावयाचे नियम विसरायला लावणारी मौजमस्ती पोलिसांनी दंड केल्यामुळे चांगलीच महागात पडली. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी थर्टी फर्स्टच्या बंदोबस्तासाठी चोख व्यवस्था केली होती. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. तरीही वाहतूक पोलिसांनी शहरात जागोजागी नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी केली. त्यात वाहन चालकांवर १७० जणांवर कारवाई करण्यात आली. थर्टीफर्स्ट म्हणजे शनिवारी रात्री नववर्षाचे स्वागत करण्यासाठी कमालीच्या उत्साहात हजारो नागरिक कुठे सह कुटुंब तर कुठे मित्रांसह रिसॉर्ट, हॉटेल्स आणि मॅनेज केलेल्या पार्ट्यांमध्ये खाऊन-पिऊन बेधुंद होण्यासाठी सामील झाले होते. त्यामुळे मद्यपी वाहन चालवणार असतील तर अपघाताचा धोका होता आणि नशेमध्ये मजेबरोबरच वादविवाद, भांडणे होण्याची देखील शक्यता असते. रस्त्यावर जर बेधुंद होऊन मद्यपी आले तर यापूर्वी अनेक हाणामारीच्या घटना घडलेल्या आहेत. एकूण ७१ ठिकाणी कारवाया झाल्या. तर झोन तीन मध्ये ४३ काशिमिरा येथे ५६ जण अशा एका १७० जणांवर कारवाई करण्यात आली. त्यांनी दारु पिऊन वाहने चालविली. त्यांचे परवाने ही रद्द होणार असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

सकाळ पा.नं.४.

# शूटिंगसाठी तुनिषाच्या आईचाच दबाव

## खान कुटुंबीयांचा आरोप ; सिजानविरोधातील सर्व दावे फेटाळले

मुंबई, ता. २ : 'तुनिषाची आई जबरदस्ती तिला शूटिंगला पाठवत होती. तिला काम करण्याची इच्छा नव्हती. तिच्याकडून जबरदस्तीने काम करून घेतले जात होते. तिला काम करण्याऐवजी आराम करायचा होता, पण तिची आई जबरदस्तीने तिच्याकडून काम करून घ्याची आणि तिला शूटिंगला पाठवायची,' असे आरोप सिजान खानची बहीण नाज फलक यांनी अंधेरीमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केले. तुनिषाच्या आत्महत्येप्रकरणी सिजान सध्या पोलिस कोठडीत आहे. तुनिषाच्या आईने सिजानवर गंभीर आरोप केले होते. त्याला उत्तर देत सिजानच्या कुटुंबाने सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

सिजानने तुनिषाला दर्ग्यात नेल्याचे आरोपदेखील फलक यांनी फेटाळले आहेत. तुनिषाच्या हिजाब घातलेल्या छायाचित्राबद्दल त्या म्हणाल्या, 'हिजाब घातलेले तुनिषाचे छायाचित्र हे शूटिंगदरम्यानचे आहे. आम्ही तिला कधीही हिजाब घालायला लावला नाही. तुनिषाच्या आईने सिजानवर केलेला आरोप पूर्णपणे चुकीचा आहे. सिजान ड्रग्सचे सेवन करत नव्हता. तुनिषाच्या आईने आमच्याविषयी गैरसमज पसरवले आहेत, असा आरोप सिजानच्या बहिणीने केला. सिजानच्या इतर मुलींशी असलेल्या संबंधांबद्दल बोलतात कुटुंबीयांनी त्याला तुनिषाशिवाय कोणतीही मैत्रीण नव्हती, त्याचे अनेक मुलींशी संबंध असल्याचे दावे खोटे असल्याचे सांगितले. सिजानच्या बहिणींनी केलेल्या दाव्यामुळे या प्रकरणाला नवीन वळण लागण्याची शक्यता आहे.



मुंबई : सिजानच्या कुटुंबीयांनी पत्रकार परिषद घेऊन आरोप फेटाळले.

## जामिनावर ७ जानेवारीला सुनावणी

नालासोपारा (बातमीदार) : सिजानच्या जामीन अर्जावर शनिवार, ७ जानेवारीला सुनावणी होणार आहे. न्यायालयाने वालिव पोलिसांना जामिनावर म्हणणे मांडण्यासाठी आज नोटीसही पाठवली आहे. सिजानच्या वकिलांनी त्याचे केस कापू नये, अशी मागणी ३० डिसेंबरला केली होती. त्यावर आज युक्तिवाद झाला. सिजान खानची मालिका सुरू असल्यामुळे त्याला केस ठेवावे लागतील, असे म्हणणे त्याच्या वकिलांनी न्यायालयात मांडले. यावर दोन्ही बाजू ऐकून घेत, उद्या (ता. ३) निर्णय होणार आहे.

# बेकायदा शाळांना केवळ नोटिसा

## शिक्षण विभागाकडून कायदेशीर कारवाई नाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई-विरार शहरांमधील ११० बेकायदा शाळांची यादी वसई शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जाहीर केली होती. मात्र, वर्ष सरत आले तरी शिक्षण विभागाकडून एकाही शाळेवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही. शिक्षण विभागाने केवळ नोटीस पाठविण्याचे सोपास्कार केले आहेत.

वसई-विरार शहरांमध्य अनेक शाळांनी जानेवारी महिना सुरू होताच पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यास सुरुवात केली आहे. त्याचे फलकही शहरांमध्ये झळकू लागले आहेत. दरवर्षी शिक्षण विभागाकडून शाळा सुरू होण्याआधी बेकायदा शाळांची यादी जाहीर केली जाते. यामुळे पालकांना मुलांचा कोणत्या शाळेत प्रवेश घ्यावा आणि घेऊ नये, याचा निर्णय घेणे सोपे होते. ज्या शाळा बेकायदा आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम शिक्षण विभागाचे आहे. वर्षभराच्या आत शिक्षण विभागाने कारवाई करणे अपेक्षित होते. शिक्षण विभागाने जुन-जुलैमध्ये अशा शाळांना नोटीस बजावली होती. त्यानंतर ज्या शाळांनी परवानगी घेतली आहे, त्यांना वगळून उर्वरित शाळांच्या बाहेर शाळा बेकायदा असल्याचे फलक लावणे गरजेचे होते. अथवा ज्या शाळांनी परवानगीसाठीच्या कोणत्याही प्रक्रिया केलेली नाही, अशा शाळांवर फौजदारी कारवाई करणे अपेक्षित आहे. केवळ नालासोपारा येथील दोन शाळांवर कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर कोणतीही कारवाई न झाल्याने अशा शाळा बिनदिक्कत सुरू आहेत.

सध्या खासगी शाळांनी मोठ-मोठ्या प्रलोभनांच्या जाहिराती करून पालकांना भुरळ घालण्याचे प्रयत्न चालवले आहेत. पण या शाळा अधिकृत असल्याची तसेच त्यांना शासन मान्यता असल्याची कोणतीही माहिती जाहिरातीवर दिली जात नाही. यामुळे शाळा अधिकृत की अनधिकृत, हे समजत नसल्याने आपल्या पाल्यासाठी कोणत्या शाळेत प्रवेश घ्यायचा, असा प्रश्न पालकांना पडला आहे.

← लोकसत्ता ५-पा-१.

# बेशिस्त वाहनचालकांवर बडगा

## वसई विभागात वर्षभरात ६२ हजार ८४४ जणांवर कारवाई; ३.४१ कोटी रु. दंड वसूल

म. टा. वृत्तसेवा, वसई

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील वसई विभागात वाहतूक पोलिसांतर्फे मागील वर्षभरात ६२ हजार ८४४ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उभारण्यात आला आहे. २०२२ या वर्षभरात कारवाई केलेल्या वाहनचालकांकडून एकूण तीन कोटी ४१ लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यातील ७९ टक्के दंडाची रक्कम वाहतूक विभागातर्फे वसूल करण्यात आली आहे.

वसईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यावरोबर रस्त्यावरील वाहनांची संख्यादेखील वाढत आहे. दुसरीकडे, अनेक ठिकाणी असलेले अरुंद रस्ते, नियमांचे उल्लंघन करणारे गतिरोधक, वाहतूक कोंडीची समस्या अशा विविध समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी अनेक वाहनचालक सर्रास वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करतात. काही चालक विविध स्टंट करतात किंवा ओव्हरटेक करतात. अशा बेशिस्त वाहनचालकांना लगाम लावण्यासाठी वसईच्या वाहतूक विभागाने दिवसरात्र पहारा देत कारवाई केली आहे. २०२२ या वर्षभरात वसईच्या वाहतूक विभागाने ६२ हजार ८४४ वाहनचालकांवर कारवाई केली आहे. यामध्ये सीटबेल्ट न लावणे, विनाहेल्मेट दुचाकी चालवणे, विरुद्ध दिशेने गाडी चालविणे, विना ड्रायव्हिंग लायसन्स गाडी चालवणे, ट्रिपल सीट, सिग्नल तोडणे, नंबर प्लेट नसणे, मद्यपान करून गाडी चालविणे अशा प्रकारच्या उल्लंघनांचा समावेश आहे. अशा वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तीन कोटी ४१ लाख ५२ हजार ५० रुपयांचा दंड ठोठावला आहे.



### सीटबेल्ट न लावल्याबद्दल सर्वाधिक कारवाया

यामध्ये सर्वाधिक सात हजार ३०२ कारवाया या सीटबेल्ट न लावणाऱ्यांवर करण्यात आल्या आहेत. उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघातानंतर सीटबेल्ट न लावणाऱ्यांवरील कारवाईस वसईत वेग आला होता. त्याअनुषंगाने वाहतूक विभागाने सीटबेल्ट न लावणाऱ्यांवर मागील वर्षात मोठी कारवाई करत, त्यांना १४ लाख ६० हजारांचा दंड सुनावला आहे. त्या खालोखाल एक हजार ४१६ कारवाया या गाडीला आरसे न लावणाऱ्या वाहनचालकांवर केल्या आहेत. त्याखालोखाल एक हजार ५२ कारवाया या नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर केल्या आहेत. मात्र शहरातील बेशिस्त वाहनचालकांना लगाम लावण्यात ही कारवाई अपुरी पडत आहे. वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी कारवाई सुरूच राहणार असल्याचे वसईच्या वाहतूक विभागातर्फे सांगण्यात आले.

**“ वसईत वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी विविध उपाययोजना, जनजागृती, चित्रफिती याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. तरीही काही वाहनचालक त्यांचे उल्लंघन करताना दिसून येतात. अशांवर वाहतूक विभाग नजर ठेवून, वेळोवेळी कारवाई करत आहे. ही कारवाई पुढेदेखील सुरूच राहणार आहे.**

- सागर इंगोले,
पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग, वसई

### ७९ टक्के दंडाची वसुली

बेशिस्त वाहनचालकांवर केलेल्या कारवाईत दंड ठोठावल्यानंतर, ती रक्कम वसूल करणे हे मोठे आव्हान असते. मात्र वसई विभागाने ७९.४४ टक्के दंडाची रक्कम वसूल केली आहे. कारवाईत ६२ हजार ८४४ वाहनचालकांना तीन कोटी ४१ लाख ५२ हजारांचा दंड ठोठावला आहे. त्यापैकी ४९ हजार ९२५ वाहनचालकांकडून दंडाची दोन कोटी ४३ लाख रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे, तर १२ हजार ९१९ चालकांकडून ९७ लाख ७५ हजारांची रक्कम अजूनही वसूल करणे बाकी असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.

लोकसत्ता पा.नं. १०४.

## वसई, विरारमध्ये अपघात आणि वाहतुकीला अडथळे

# सोयीच्या रस्त्यासाठी दुभाजक तोडण्याचे प्रकार

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** वसई, विरारमध्ये रस्त्यावरील दुभाजकांना तोडून सोयीचे रस्ते करण्याचे प्रकार झपाट्याने वाढत चालले आहेत. यामुळे रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण वाढत असून वाहतुकीला अडथळे निर्माण होत असताना स्थानिक प्रशासन मात्र कोणतीही कारवाई करत नसल्याने दिसत आहे.

वसई, विरार परिसरात पालिका आणि सार्वजनिक विभागाने रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी रस्त्याच्यावर दुभाजक टाकून अनेक ठिकाणी एकमार्गी रस्ते तयार केले आहेत. यात सर्वाधिक रस्ते हे मुख्य शहरात आहेत, मात्र या दुभाजकांमुळे अनेक दुकानांना मार्ग मिळत नसल्याने अथवा एकाच मार्गावरील ग्राहकांचा पर्याय उरल्याने शहरातील विविध ठिकाणी दुकानदारांनी आपल्या सोयीसाठी हे दुभाजक तोडून रस्ते तयार केले आहेत. यामुळे अनेक वेळा वाहनचालक गर्दीतून मार्ग काढताना या रस्त्यांचा वापर करताना अपघाताचे शिकार ठरत आहेत. मुख्यत्वे रात्रीच्या वेळी हे मार्ग अधिक धोकादायक बनत चालले आहेत. शहरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी दुकानदारांनी आपल्या (पान ४ वर)



### तक्रार करूनही कारवाई नाही

यासंदर्भात माजी नगरसेवक पंकज पाटील यांनी वाहतूक पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी तक्रार केली आहे, मात्र या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. तर वाहतूक पोलीस शाखा विरारचे पोलीस निरीक्षक दादाराम करांडे यांनी याबाबत माहिती देताना सदरचे रस्ते प्रशासनाच्या मालकीचे आहेत, त्यांनी कारवाई करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. तर महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत माहिती घेऊन कारवाई केले जाईल असे सांगून काढता पाय घेतला.

## सोयीच्या रस्त्यासाठी दुभाजक तोडण्याचे प्रकार

(पान १ वरून)दुकानासमोरील दुभाजक तोडून ठेवले आहेत. तर अशीच स्थिती महामार्गावरसुद्धा आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावर अनेक ठिकाणी उपाहारगृहधारकांनी आपला धंदा वाढावा म्हणून सुरक्षा कठडे कापून मार्ग केले आहेत. यामुळे महामार्गावर अपघातांची संख्या वाढली आहे.

वसई-विरार मुख्य शहरात आणि महामार्गावर अशा पद्धतीने दुभाजक तोडून अवैध रस्ते करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अवैध रस्ते आणि धोकादायक वळणांमुळे वाहनचालकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. यामुळे अशा पद्धतीने रस्ते बनविणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासन याबाबत जागृत नसल्याने रस्त्याचे दिवसाढवळ्या मोठे नुकसान करून नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू असतानाही प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

लोकसत्ता पु-पा-१०

# मद्यविक्रीच्या परवान्यांत वाढ

## नववर्षाचे स्वागत जल्लोषात एकही कारवाई नाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात ३१ डिसेंबरच्या रात्री नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. किनारपट्टीवरील रिसॉर्ट, हॉटेल्स आणि ढाब्यांमध्ये रात्रभर मेजवान्या सुरू होत्या. अनेक ठिकाणी परवान्याशिवाय मद्यविक्री सुरू होती. मात्र एकही ठिकाणी कारवाई करण्यात आली नाही. मद्य परवाने घेण्यात आल्याने कारवाई झाली नसल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे सांगण्यात आले.

कुठल्याही प्रकारचे निर्बंध नसल्याने नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यात आले. किनारपट्टीवरील रिसॉर्ट, ढाबे आणि हॉटेल्समध्ये मेजवान्यांचे आयोजन करण्यात आले होते. यंदा शासनाने पहाटे ५ वाजेपर्यंत परवानगी दिल्यामुळे रात्रभर या ठिकाणी मेजवान्या सुरू होत्या. मात्र या ठिकाणी स्थानिक अर्नाळा पोलिसांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

### नियम काय आहे?

महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या कलम ६८ नुसार खासगी जागा जसे, रिसॉर्ट्स, धाबे, रेस्टॉरंट्स, लॉन्स इत्यादी ठिकाणी ग्राहकांना अवैधपणे मद्य विक्री करून त्यांना मद्य प्राशन करण्यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे व त्यासाठी त्यांच्याकडून पैशांच्या स्वरूपात मोबदला घेणे तसेच, कलम ८४ नुसार अवैधरीत्या सार्वजनिक ठिकाणी मद्य प्राशन करणे गुन्हा आहे.

३१ डिसेंबरच्या रात्री नवीन वर्षाचे स्वागत नागरिकांनी नियमांचे पालन करून करावे यासाठी आम्ही जनजागृती सुरू केली होती. वसई विरारच्या पश्चिम पट्ट्यात असलेल्या रिसॉर्ट, हॉटेल्स परिसरात विशेष पथकाद्वारे गस्ती घालून लोकांना आवाहन करण्यात येत होते. त्यामुळे परवान्यांची संख्या १६ वरून वाढून ६१ झाली होती. परवान्यांची संख्या वाढल्याने कारवाई झाली नाही, असे पालघरच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सुधाकर कदम यांनी सांगितले.



# १७० मद्यपी वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** ३१ डिसेंबर व नवीन वर्षाचे स्वागत याच पार्श्वभूमीवर वसई विरार व मीरा भाईंदर शहरात पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यात मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या १७० वाहनचालकांच्या विरोधात पोलिसांनी कारवाई केली आहे.

नवीन वर्षाच्या निमित्ताने स्वागतासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री विशेष पार्ट्यांचे आयोजन करण्यात येते. काही वाहनचालक हे मद्यपान करून वाहने चालवितात यामुळे अपघातासारखे प्रकार घडतात. अशा मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांना आवर घालण्यासाठी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याच्यासाठी पोलिसांनी ३१ डिसेंबरच्या रात्री कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. मीरा-भाईंदर व वसई-विरार आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात २५० पोलीस अधिकारी, १ हजार २०० पोलीस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले होते. रात्रभर विविध ठिकाणी करण्यात आलेल्या नाकाबंदीदरम्यान १७० वाहनचालक हे मद्यपान करून वाहन चालवीत असल्याचे आढळून आले असून त्यांच्याविरोधात पोलिसांनी कारवाई केली आहे.

लोकसत्ता पु.पा.४

# छुपा कॅमेरा लावून अश्लील चित्रीकरण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** एका महिलेच्या घरातील घड्याळात छुपा कॅमेरा लावून तिचे अश्लील चित्रीकरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून मीरा रोड पोलिसांनी तिच्या मित्राच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी महिला मीरा रोड येथे राहत असून एका खासगी कंपनीत काम करते. तिच्या मित्राने नोव्हेंबरमध्ये तिच्या घरातील घड्याळात छुपा कॅमेरा लावून तिचे अश्लील चित्रीकरण केले होते. हे चित्रीकरण त्याने तिच्या परिचितांना पाठवले. तसेच तिच्या कंपनीच्या मेलवर फिर्यादीची बदनामी करणारे मेल पाठवले. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात दीपुल चौहान (३५) याच्या विरोधात भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३५४, ३५४ (सी), ३५४ (डी) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता ५-५-४.

# ५५० ठिकाणे अद्याप असुरक्षित

## वसई-विरारमध्ये सीसीटीव्ही, प्रकाश यंत्रणेचा अभाव


**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाने मागील वर्षी ऑगस्टमध्ये शहरातील असुरक्षित ठिकाणांचे सर्वेक्षण केले होते. त्यानुसार वसई-विरार परिसरात ५५० ठिकाणे असुरक्षित असल्याचा अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यात परिमंडळ-२ वसईमध्ये ३५१ ठिकाणे, तर परिमंडळ - ३ मध्ये १९९ ठिकाणे असुरक्षित नोंदविण्यात आली आहेत. पण पाच महिने उलटले तरी या बाबत पोलिसांकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

शहरांमध्ये झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि बेकायदा बांधकामांमुळे लोकवस्त्या, त्यात यंत्रणांचा अभाव, यामुळे असुरक्षित आणि संवेदनशील ठिकाणांची वाढ होऊन गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. शहरातील गुन्हेगारीवर अंकुश मिळविण्यासाठी आणि वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने शहरातील गुन्हे घडण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणांचे सर्वेक्षण माजी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

त्यानुसार चोरी, सोनसाखळी चोरी, लुटपाट, वाहनचोरी, बतावणीचे गुन्हे, महिलांवरील अत्याचार, छेडछाड, अमलीपदार्थ खरेदी-विक्री आणि सेवन, तसेच इतर छोटे-मोठे गुन्हे जेथे सातत्याने घडतात, अशा ठिकाणांची यादी तयार केली होती. यात गर्दीच्या ठिकाणांच्यासह निर्जन ठिकाणांचा सुद्धा समावेश होता. या सर्व ठिकाणी स्थानिक पोलिसांच्या मदतीने गस्त वाढविण्यात येणार होती. तसेच पालिकेच्या आणि महावितरण विभागाच्या वतीने या ठिकाणी प्रकाश यंत्रणा, पथदिव्यांची व्यवस्था केली जाणार होती. काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले जाणार होते. पण पाच महिने झाले तरी हा अहवाल अजूनही कागदावरच आहे. त्यामुळे शहरात दिवसेंदिवस गुन्ह्यांचा आलेख वाढत आहे.

### दाते यांच्या बदलीमुळे फटका



पोलिसांनी सर्वेक्षण केलेल्या ५५० ठिकाणांमध्ये असे आढळून आली की, त्या ठिकाणी कोणत्याही क्षणी गुन्हे घडू शकतात. यात अनेक निर्जनस्थळांचा समावेश आहे. तर, काही ठिकाणी सक्षम प्रकाश व्यवस्था नाही. सीसीटीव्ही नाहीत, तर काही ठिकाणी पूर्ण अंधार आहे. यामुळे गुन्हे घडण्याची शक्यता अधिक असल्याने पोलिसांनी तातडीने यावर उपाय योजना करणे गरजेचे होते. मात्र, तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांची बदली झाल्याने हा विषय मागे पडला आहे. यामुळे पोलिसांनी या संदर्भात गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाय योजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

लोकसत्ता ५-५-४.

# बलात्कार प्रकरणातील आरोपीला पाच वर्षांनंतर अटक

**विरार :** अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून फरार झालेल्या आरोपीला पाच वर्षांनंतर विरार पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी हा मालवाहतूक ट्रकवर क्लिनर म्हणून काम करत होता.

विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०१८ मध्ये एका १७ वर्षीय मुलीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या एका व्यक्तीने बलात्कार केला होता. त्यानंतरही त्याने तिला जिवे ठार मारण्याची धमकी देऊन तिच्यावर वेळोवेळी अतिप्रसंग केला होता. त्याच्या जाचाला कंटाळून या मुलीने विरार पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानंतर आरोपी फरार झाला होता. तो गुजरात ते




मुंबईदरम्यान ट्रकवर काम करत होता. विरार पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक अशोक परजने आणि पोलीस हवालदार चव्हाण यांनी त्याच्या हालचालींवर पाळत ठेवली होती. खबऱ्याकडून त्यांना आरोपीची माहिती मिळाल्यानंतर त्याला सापळा रचून शनिवारी अटक केली.

DOWNWARD TREND

# ACB witnesses marginal 4% dip in corruption cases

SURESH GOLANI / Mumbai

The State Anti-Corruption Bureau (ACB) has witnessed a marginal 4% dip in the number of corruption cases registered in 2022 as compared to 2021. A cursory glance at the statistical records between January 1 and December 29, 2022 (uploaded on the ACB's official website) reveals a total 744 cases as compared to 773 registered in the corresponding period in 2021.


This year, the 744 cases include 723 traps, 12 disproportionate assets (DA) cases and nine other graft related offences. The number of tainted persons caught in connection with trap cases in 2022 has gone down to 1,024 from 1,064 last year.

However, as a routine pattern which is noticed every year, corrupt personnel from the revenue and police wings seemed engaged in a tough battle to clinch the top two slots. While the revenue-land records wing topped the list with 173 traps, their counterparts in the police department were not far behind with their indulgence in 160 bribe cases.

A total of 62 traps were reported against panchayat samiti members, followed by 46 related to municipal corporations, 43 zilla parishad and even 28 staffers attached to the education wing amongst others, netted by the ACB last year. This apart from elected representatives and mediators who were also booked for graft by the ACB in 2022.

The tainted accused include 74 class I officers, 123 class II officials, 558 and 44 class III and IV staffers, respectively. The ACB has also blown the lid off 12 disproportionate assets cases and seized unaccounted wealth amounting to over Rs24 crore from 20 people.

Among the eight zonal divisions, Pune executed the highest number of traps (155) in 2022, followed by 124 and 121 by Nashik and Aurangabad. Thane and Nagpur divisions registered 83 and 74 cases, respectively. Notably, only 38 people in 29 cases were convicted in 2022.





# MBVV police recruitment commences in Bhayandar

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The process to recruit a total of 996 personnel including police constables and drivers for the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police commissionerate began at the Netaji Subhash Chandra Bose municipal ground in Bhayandar on Monday. A total of 73,221 applications from 60,989 male and 12,232 female aspirants have been received for the police constable's posts, while 1,237 applicants – including 1,196 male and 41 female – are in the fray for the driver posts, officials said.

THE FREE PRESS JOURNAL

Tu
ht

लोकमत

# कोयता घेऊन दहशत माजविली

**नालासोपारा :** नालासोपारा परिसरात रात्री धारदार कोयता घेऊन दहशत माजविणाऱ्या आरोपीविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुळींज पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार सागर पाटील हे शनिवारी रात्री दहाच्या सुमारास प्रगतीनगर, नालासोपारा -पूर्व येथे पेट्रोलिंग करीत असताना आरोपी योगेश औताडे (३०) हा हातात धारदार कोयता घेऊन सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने आरडाओरडा करताना आढळून आला होता. रविवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# दहा वर्षांच्या मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** नालासोपारा येथे दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रगतीनगर येथे राहणारी अल्पवयीन मुलगी रविवारी दुपारी बाराच्या सुमारास जवळच राहणाऱ्या आजीच्या घरी एकटी जाण्यासाठी निघाली होती, मात्र त्यानंतर ती हरवली. तिला आरोपीने फूस लावून पळवून नेल्याच्या संशय आल्याने मुलीच्या आईने रविवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

वाढते अपघात रोखण्यासाठी आयुक्तालय हद्दीत मोहीम

# झिंगाट झालेल्या १७० जणांची पोलिसांनी रस्त्यावरच उतरवली झिंग!

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : दारू पिऊन वाहन चालविल्याने स्वतःसह दुसऱ्यांच्या जिवालाही धोका निर्माण होतो. यामुळे होणारे वाढते अपघात रोखण्यासाठी आयुक्तालयातील पोलिसांनी वेळोवेळी मोहीम राबवली आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री झिंगाट होऊन वाहन चालवणाऱ्या १७० वाहनचालकांवर वाहतूक विभागाने ड्रंक अँड ड्राईव्हच्या केसेस करून कारवाई केली आहे.

इतर दिवशीही रात्रीच्या वेळी दारू पिऊन वाहन चालविणे टाळावे यासाठी वाहनचालकांत प्रबोधन केले जात आहे. वाढते अपघात रोखण्यासाठी पोलिस आयुक्तांनी वेळोवेळी आयुक्तालयात अनेक वेळी मोहीम आखून दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली.



## पार्टीवरून मित्रांमध्ये फ्रीस्टाईल

अनेकवेळा हॉटेल, बारमध्ये पार्टी करण्यास बसलेल्या मित्रांमध्ये झिंगाट झाल्यावर फ्रीस्टाईलदेखील झाल्या आहेत. त्यातून हॉटेल, बारची तोडफोड झालेली आहे. अशा टार्गेट युवकांवरही पोलिसांची करडी नजर होती.

याशिवाय अशांविरोधात कारवाई करण्यास पोलिसांना सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे झिंगाट होऊन वाहन चालविणाऱ्यांवर वचक बसला आहे. आपल्या आणि दुसऱ्याच्या जिवाचा विचार करता दारू पिऊन वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वसईत ७१, विरारमध्ये ४२ तर काशिमीरात ५६ जणांवर कारवाई

पोलिस आयुक्तालयात वाहतूक पोलिसांनी दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर काशिमीरा येथे ५६ केसेस, वसईत ७१ केसेस आणि विरारमध्ये ४३ केसेस अशा एकूण १७० ड्रंक अँड ड्राईव्हच्या केसेस केल्या आहेत.



## प्रसंगी हॉटेलचालकांवरही कारवाई




नियम, वेळमर्यादा यांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल चालकांवरदेखील पोलिसांनी आयुक्तालयात वेळोवेळी कारवाई केली. त्यामुळे रात्रीच्या दिलेल्या वेळेतच हॉटेल चालवून नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

### दारु पिऊन वाहन चालविणे गुन्हा



थोड्या मजेसाठी आपला आणि समोरच्या व्यक्तीचा जीव धोक्यात घालू नका. दारु पिऊन वाहन चालविणे गुन्हा आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे यंदा अपघात कमी झाले आहेत.

\- पोलिस प्रशासन

## रस्त्यावर पार्टी करणारे कोठडीत

रात्री सार्वजनिक रस्त्यावर पार्टी कराल तर पोलिस कोठडीची हवा खावी लागेल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.



## दोन हजार पोलिस होते तैनात

मीरा भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलिस आयुक्त, सर्व पोलिस उपआयुक्त, सर्व सहा पोलिस आयुक्त यांच्या देखरेखीखाली एकूण २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान ३१ डिसेंबरला रात्री कडक बंदोबस्तामध्ये तैनात होते.

Hello Vasai
Page No. 1 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# सावकारी कर्ज किती टक्क्याने मिळते?




मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अडचणीला बँकेऐवजी कमी वेळात पैसे मिळतात म्हणून अनेकजण खासगी सावकारांचा आधार घेतात. मात्र, तेच आपल्याला अडचणीत आणत आहेत. सावकारांकडून पैसे घेऊन अव्वाच्या सव्वा व्याज देऊन अनेक जण मेटाकुटीला येत असून, दरमहिना १० टक्के व्याज दराने सध्या कर्ज दिले जात आहे.

## वसईत ४९ जणांकडे सावकारीचा परवाना

खासगी सावकारी करावयाची असल्यास उपनिबंधक कार्यालयाकडे नोंदणी बंधनकारक आहे. वसईमध्ये सध्या ४९ अधिकृत सावकार नोंदणीकृत आहेत. परवाना घेऊन सावकारी करणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. त्यापेक्षा अनधिकृत सावकारी गल्लीबोळात पाहावयास मिळते.

## किती टक्क्याने मिळते कर्ज?

खासगी सावकारांकडून सध्या दरमहा १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाते. कर्ज घेताना कोरे धनादेश घेतले जातात. मुद्दल, व्याज देण्यास उशीर झाल्यास त्यांच्याकडून अरेरावी केली जाते.

## कर्जाच्या वाटपावर नियंत्रण नाहीच

नोंदणीकृत सावकारांनी केलेल्या व्यवहारावर उपनिबंधक कार्यालयाचे लक्ष असते. मात्र, इतर सावकारांनी किती कर्ज दिले, किती व्याजाची वसुली केली, यावर नियंत्रण कोणाचेच नाही.

## अनधिकृत सावकारी करणाऱ्यांविरुद्ध तक्रार कोठे कराल?

सावकारीतून जमीन बळकावली गेली असल्यास शेतकरी त्याची तक्रार तालुका स्तरावर सहायक निबंधक यांच्याकडे करतात. त्यात सावकारीचे प्रकरण आढळून आले, तर त्याची सुनावणी ही जिल्हा उपनिबंधक यांच्या स्तरावर केली जाते. तसेच पोलिस प्रशासनालाही तक्रार करू शकतात.

## चार पैसे आले की झाला सावकार

कोणत्याही मार्गाने काही रक्कम आली की अगदी मिसरूड न फुटलेला तरुणही सावकारी करू लागला आहे. व्याजाची रक्कम मोठी असल्याने यात अनेकजण येत असले तरी पोलिसांकडून यावर कारवाई अपेक्षित आहे.

## बिगरशेती कारणासाठीच कर्ज


खासगी सावकाराकडून घेतलेले हे कर्ज बिगरशेती कारणासाठीच घेतले जाते. शेतीसाठी सहकारी बँकेकडून कर्ज मिळत असले तरी त्याची प्रक्रिया किचकट आहे. अनेकदा शेतकरी सावकारांच्या दारात जात असल्याचे दिसते.

Hello Vasai
Page No. 3 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत











**पोलिस व्हायचे आम्हाला :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाअंतर्गत पोलिस भरती प्रक्रियेला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. नोंदणी केलेल्यांची पहिल्या दिवशी भाईंदरमधील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर मैदानी चाचणी घेण्यात आली. यावेळी पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त आयुक्त श्रीकांत पाठक आणि पोलिस अधिकारीवर्ग मैदानावर हजर होते. यावेळी पोलिसांनी सहभागी उमेदवारांना चाचणीचे नियम समजावून सांगितले.

लोकमत

## वाहतूककोंडीत भर : पादचाऱ्यांची होते गैरसोय

# या फेरीवाल्यांचे करायचे काय?, भर रस्त्यात पायात पाय!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्याची महापालिकेची घोषणा केवळ हवेत विरली आहे. आजही शहरातील पदपथांवर फेरीवाल्यांनी बस्तान मांडले असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत आहे. रस्त्यावरच हातगाड्या उभ्या केल्या जात असल्याने रस्त्यावरून चालणे पादचाऱ्यांना अवघड होऊन बसले आहे. विरार, नालासोपारा आणि वसई स्थानक परिसराला बाजाराचे स्वरूप आले असून शहरातील रस्ते फेरीवालामुक्त होऊन वसईकरांना दिलासा कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सुट्टी, सणांच्या दिवशी फेरीवाल्यांचे रस्त्यावर बस्तान येत असल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागतो आहे. काही फेरीवाले रस्त्यावर आपले बस्तान रात्री उशिरापर्यंत ठेवत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. तुळींज पोलिसांनी रेल्वे स्थानक व गर्दीच्या परिसरातील फेरीवाले हटवण्यासाठी धडाकेबाज मोहीम सुरू केल्याने काही दिवस स्थानकांबाहेरचा परिसर फेरीवालामुक्त झाला होता. पण आता या मोहिमेचे तीनतेरा वाजले आहेत. नालासोपारा पूर्व आणि पश्चिमेकडील परिसरात फेरीवाल्यांनी पुन्हा बस्तान बसवले आहे. त्यामुळे प्रवासी व पादचाऱ्यांना रेल्वे स्थानकात जाण्यासाठी मार्ग मिळत नसल्याच्या तक्रारी प्रवासी करत आहेत. शनिवारी, रविवारी व सुट्टीच्या दिवशी महापालिकेचे पथक फिरकत नसल्याने नालासोपाऱ्यात फेरीवाल्यांना सगळे फुटपाथ आंदण मिळाल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

नालासोपारा पूर्वेकडे फेरीवाले, पोलिस आणि महापालिकेमध्ये पकडापकडीचा खेळ सुरू आहे. रेल्वे स्थानकाच्या परिसरातील फेरीवाल्यांना पूर्णपणे हटवण्यात आले होते. मात्र, आता पुन्हा हळूहळू त्यांनी ठाण मांडण्यास सुरुवात केली आहे. पालिकेचे कर्मचारी माल जप्त करण्यासाठी आले, तर आजूबाजूच्या दुकानांत माल ठेवतात किंवा थेट स्थानकात माल घेऊन पळतात. संध्याकाळच्या सुमारास आचोळा रोडपासून थेट रेल्वे स्थानकाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात फेरीवाले रस्त्यावर उभे असतात.



वसई-विरारमध्ये भर रस्त्यावरच फेरीवाले दुकाने मांडून बसतात.

### स्थानक परिसर गजबजलेला

- नालासोपारा स्थानकाबाहेरही फेरीवाल्यांचे बस्तान बसले आहे. विशेषत: तुळींजला त्यांची नेहमीच गर्दी असते. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना स्थानकाबाहेर पडणे आणि स्थानकापर्यंत पोहोचणे अत्यंत जिकिरीचे होते.
- स्थानकापासून अवघ्या १०० मीटर अंतरातच बस आणि रिक्षा स्टॅंड आहे. येथूनच मनपा, एसटी, ट्रॅव्हल्स बसेस जातात.
- रिक्षा, टॅक्सी, खासगी वाहने व अवजड वाहनांच्या वर्दळीने या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. याशिवाय बस स्टॅंडजवळ फेरीवाले ठाण मांडत असल्याने नागरिकांना स्थानक परिसरात चालणे मुश्कील होत आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# दोन बहिणींचा विनयभंग

**नालासोपारा :** नालासोपारा येथे दोन सख्ख्या बहिणींचा भररस्त्यात टोळक्याकडून विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या दोन बहिणी रविवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास कॅटरिंगच्या कामावरून घरी परतत असताना नालासोपारा पूर्व ओव्हर ब्रिजच्या खाली रिक्षाची वाट पाहत उभ्या होत्या. यावेळी तेथे चार आरोपी तरुणांनी त्यांचा विनयभंग केला होता. रविवारी सकाळी तुळींज पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा

Hello Vasai
Page No. 1 Jan 03, 2023
Powered by: erelego.com

# हिन्दू धर्म के लिए छत्रपति संभाजी महाराज ने दी थी प्राणों की आहुति

## मीरा भायंदर में अजित पवार के खिलाफ विरोध प्रदर्शन

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरों (विनय महाजन)** राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी नेता अजित पवार द्वारा महाराष्ट्र विधानमंडल के शीतकालीन सत्र में छत्रपति शिवाजी महाराज के उत्तराधिकारी संभाजी महाराज के बारे में कहा कि वे धर्मवीर नहीं थे द्य उनके इस वक्तव्य के विरोध में आज मीरा भायंदर बीजेपी जिला मध्यवर्ती कार्यालय पर विरोध प्रदर्शन किया गया द्य विरोध प्रदर्शन में प्रदेश जिला तथा मंडल के सभी पदाधिकारी और भारी संख्या में कार्यकर्ता शामिल हुए ।जिला अध्यक्ष




एड रवि व्यास ने कहा कि सत्ता हाथ से जाते ही एनसीपी बौखला गई है। यही कारण है कि वह अत्यंत पराक्रमी तथा धर्म के लिए अपने प्राणों की आहुति देने वाले छत्रपति संभाजी राजे महाराज के बारे में अपमानजनक वक्तव्य दे रही है द्य

उन्होंने कहा कि मुगलों द्वारा धोखे से गिरफ्तार होने के बावजूद छत्रपति संभाजी महाराज ने हिम्मत नहीं हारी द्य औरंगजेब द्वारा इस्लाम धर्म अपनाने की मांग को ठुकराते हुए उन्होंने अपने प्राणों की आहुति दे दी। मुगल एक महीने तक क्रूरता पूर्वक उन्हें प्रताड़ित करते रहे, उनकी आंखें फोड़ दी गई द्य जीभ काट दी गई,परंतु उन्होंने इस्लाम धर्म कबूल नहीं किया द्य छत्रपति संभाजी महाराज ने अपने कम शासनकाल में 210 युद्ध किए और उनकी सेना एक भी युद्ध में पराभूत नहीं हुई द्य ऐसे महान वीर और हिंदू धर्म के प्रति प्रेम रखने वाले छत्रपति संभाजी महाराज के बारे में यह कहना कि वे धर्मवीर नही थे, उनके साथ साथ वीरों की धरती कही जाने वाली महाराष्ट्र की भूमि का भी अपमान है द्य

# 170 लोगो पर ड्रिंक एंड ड्राइव के तहत पुलिस की कार्यवाई

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरों (विनय महाजन)** इस साल नये वर्ष के उपलक्ष्य मे राज्य सरकार ने सभी रेस्तरां और बार को सुबह 5 बजे तक खोलने की अनुमति दी थी, नये वर्ष के अवसर पर लोग रात में शराब पार्टी करतें है और बाद में वाहन चलाकर यातायात नियमों का उल्लंघन करते हैं। वह शराब के नशे में तेज रफ्तार वाहन चलाते हैं, जिससे हादसे का बड़ा डर भी बना रहता है। 31



दिसंबर रात को पुलिस विभाग ने कुल 170 लोगो पर शराब पीकर वाहन चालने के जुर्म मे कार्रवाई की द्य यह कार्यावाई आयुक्तालय के कार्यक्षेत्र मे विभिन्न जगहों पर की गई 7 मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय ने हर बार की तरह इस साल भी नए वर्ष के उपलक्ष्य में सुरक्षा की दृष्टि से काफी सखूती दिखायी, और आयुक्तालय के कार्य क्षेत्र मे 3000 पुलिस अधिकारियों और कर्मचारियों की टीम बनायीं थी द्य जिसमे 250 पुलिस अधिकारी, 1200 पुलिस अमलदार, 250 होमगार्ड और 300 महाराष्ट्र सुरक्षा बल के जवान शामिल थे 7

# ट्रैफिक मार्शल पर जानलेवा हमला, हमलावर पुलिस की गिरफ्त मे

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरों (विनय महाजन)** एक प्राइवेट कंस्ट्रक्शन कंपनी में कार्यरत कर्मचारी पर जानलेवा हमला करने वाले आरोपियों को नवघवर पुलिस ने भाईंदर पश्चिम के शिवसेना गली से गिरफ्तार कर लिया है 7प्राप्त जानकारी के अनुसार जे कुमार कंस्ट्रक्शन कंपनी में कार्यरत कर्मचारी की 24 दिसंबर को किसी आज्ञात लोगों से कहासुनी हो गई और बात झगड़े में बदल गई, और 7-8 लोगों ने मिलकर उक्त कर्मचारी और उसके मित्र पर जानलेवा हमला कर दोनों को घायल कर दिया 7

इस घटना की रिपोर्ट नवघर पुलिस स्टेशन में 307, 326, 323, 504, 506, 143, 147, 148, 149 के तहत दर्ज कर ली गयी द्य अधिकारियो के मार्गदर्शन में नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक मिलिंद देसाई ने इस मामले को गंभीरता से लिया प्राथमिकी और तकनीकी सहायता की मदद से पुलिस ने इस घटना में शामिल 6 लोगों को




भायंदर पश्चिम स्थित शिवसेना गली से गिरफ्तार कर लिया, और घटना मे इस्तेमाल किये हुये हथियार को भी बरामद कर लिया 7 यह कार्य परिमण्डल-1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले और सहायक पुलिस आयुक्त शशिकांत भोसले के मार्गदर्शन में नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक मिलिंद देसाई, पुलिस निरीक्षक प्रकाश माशाल, क्राइम ब्रांच यूनिट के योगेश काले, हनमंत पडलकर, अभजीत लांडे, भूषण पाटिल, गणेश, सुरेश आदि ने किया 7